महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

**क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.२३/पदभरती/का-४** **जाहिरात सुधारणा क्र.२/२१-०२-२०२३**

## परिपत्रक

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (Govt. ITI) विविध व्यवसायातील शिल्प निदेशक (Craft Instructor) (गट-क) संवर्गातील पदभरती करिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्याबाबत दि.१७/०८/२०२२ रोजी www.dvet.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने श्री.बाळू नामदेव भोसले व इतर १२ यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे Original ApplicationNo.७६१/२०२२ अन्वये याचिका दाखल केली होती. सदर याचिके संदर्भात मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०३/०२/२०२३ रोजी दिलेल्या न्याय निर्णयाच्या अनुषंगाने संचालनालयाच्या संकेतस्थळावर दि.१७/०८/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमधील तरतूदी खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| १५.२१ | सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३/०८/२०१४ व त्या अनुषंगाने राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/शुद्धीपत्रक/ परिपत्रक इत्यादी मधील तरतूदीनुसार उमेदवारांची गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येईल.<br>**ऐवजी**<br>बाळू नामदेव भोसले व इतर १२ विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर यांनी O.A.No.७६१/२०२२ अन्वये दाखल केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०३/०२/२०२३ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार सामायिक परीक्षा व व्यावसायिक चाचणीकरिता उपस्थित असलेल्या व एकूण २०० गुणांपैकी किमान ४५ टक्के गुण (९०) प्राप्त केलेल्या उमेदवारांमधून CITS अर्हताधारक उमेदवारांची गुणवत्ता यादी (Merit List of CITS Candidates) व CITS अर्हता धारण करीत नसलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी (Merit List of Non-CITS Candidates) अशा दोन स्वतंत्र गुणवत्ता याद्या प्रसिद्ध करण्यात येतील. |
| १५.२२ | **प्राधान्यक्रम :-**<br>ज्या पात्र उमेदवारांचे एकूण गुण समान असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल.<br>i) CITS प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.<br>ii) उपरोक्त (i) नुसार एकापेक्षा जास्त उमेदवार असल्यास अथवा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य असल्यास प्राधान्य देण्यात येईल. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दि.२३/०१/२००६ अन्वये गठित करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटुंबास शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटुंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी/मुलगे/मुलगी).<br>iii) उपरोक्त (i) व (ii) मधील व अन्य पदांच्या बाबतीत उपरोक्त (ii) मधील अटी देखील समान ठरत |

| | |
|---|---|
| | असल्यास अथवा उमेदवार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसल्यास वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.<br>iv) उपरोक्त (i), (ii) व (iii) मधील व अन्य पदांच्या बाबतीत उपरोक्त (ii) व (iii) मधील अटी देखील समान ठरत असल्यास अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चस्तर शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.<br>v) उपरोक्त (i), (ii), (iii) व (iv) मधील अटी देखील समान ठरत असल्यास पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित केलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चस्तर गुण प्राप्त केलेल्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.<br>ऐवजी<br>*** प्राधान्यक्रम :-**<br>अ) मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०३/०२/२०२३ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार निवड यादी तयार करतांना CITS अर्हताधारक उमेदवारांना CITS अर्हता धारण करीत नसलेल्या उमेदवारांपेक्षा प्राधान्य देण्यात येईल. त्यानुसार निवड यादी तयार करतांना CITS अर्हताधारक उमेदवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्यास संबंधित सामाजिक/ समांतर आरक्षणानुसार CITS अर्हता धारण करीत नसलेल्या पात्र उमेदवारांचा CITS अर्हता धारण करण्याच्या अटीस अधिन राहून सामाजिक/समांतर आरक्षणानुसार निवड यादीत समावेश करण्यात येईल. निवड यादीकरिता पुरेशा प्रमाणात CITS अर्हताधारक उमेदवार उपलब्ध असल्यास CITS अर्हता धारण करीत नसलेल्या उमेदवारांचा निवड यादीमध्ये समावेश करण्यात येणार नाही.<br>ब) निवड यादीत समावेश करतांना एकापेक्षा जास्त पात्र उमेदवारांचे एकूण गुण समान असल्यास गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल.<br>i) उमेदवार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य असल्यास प्राधान्य देण्यात येईल. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७,दि.२३/०१/२००६ अन्वये गठित करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटुंबास शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटुंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी/मुलगे/मुलगी).<br>ii) उपरोक्त (i) मधील अट देखील समान ठरत असल्यास अथवा उमेदवार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसल्यास वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.<br>iii) उपरोक्त (i) व (ii) मधील अटी देखील समान ठरत असल्यास अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चस्तर शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.<br>iv) उपरोक्त (i), (ii) व (iii) मधील अटी देखील समान ठरत असल्यास पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित केलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चस्तर गुण प्राप्त केलेल्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. |

* (सदर परिपत्रक हे विविध याचिकाकर्त्यांनी दाखल केलेल्या याचिकांवरील सक्षम न्यायालयाच्या न्याय निर्णयाच्या अधिन राहून प्रसिद्ध करण्यात येत आहे.)

तरी उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
( दि. अं. दळवी )
संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.